फेफरे[8] येते तेव्हा व्यक्तीच्या हालचाली थांबवण्याचा प्रयत्न करू नका

त्यांचे शरीर थरथरायचे थांबल्यानंतर, त्यांना कुशीवर वळवा. मात्र, फेफरे येत असताना त्यांच्या तोंडात अन्न किंवा द्रवपदार्थ असेल तर, त्यांना ताबडतोब त्यांच्या कुशीवर वळवा.[4,7]

रुग्ण जोवर बरा होत नाही तोपर्यंत त्यांच्यासोबत रहा आणि त्यांच्याशी शांतपणे बोला.[7]



शक्य असल्यास, फेफरे येण्याची सुरुवात कधी झाली आणि ते कधी संपले ती वेळ नोंदवून ठेवा.[7]

झटका येऊन गेल्यावर त्यांना झोप लागली तर, त्यांना त्रास देऊ नका; मात्र, त्यांच्या श्वासाकडे लक्ष ठेवा.[8]



फेफरे 5 मिनिटांपेक्षा जास्त काळ सुरू राहिले, व्यक्ती पूर्णपणे शुद्धीत आली नाही, किंवा फेफऱ्याचा झटका आला असताना व्यक्ती गंभीर जखमी झाली तर आपत्कालीन वैद्यकीय मदतीसाठी संपर्क साधा.[7]

## वस्तुस्थिती



**अपस्मार असलेल्या लोकांपैकी 70% लोक फेफरे-विरोधी औषधांचा योग्य वापर केल्यामुळे फेफरे-मुक्त होऊ शकतात.**

Reference

1. Epilepsy [Internet] [Updated Feb 9, 2022]. Available at: https://www.who.int/news-room/fact-sheets/detail/epilepsy. Accessed on 20 Oct 2022.
2. Trinka E, Kwan P, Lee B, Dash A. Epilepsy in Asia: Disease burden, management barriers, and challenges. Epilepsia. 2019 Mar;60 Suppl 1:7-21.
3. Evaluation of a first-time seizure [Internet]. Available at: https://www.hopkinsmedicine.org/health/conditions-and-diseases/epilepsy/evaluation-of-a-firsttime-seizure. Accessed on 13 Feb 2023.
4. Seizures [Internet]. Available at: https://www.healthdirect.gov.au/seizures#how-to-help. Accessed on 13 Feb 2023.
5. Epilepsy in Children. Available at: https://medlineplus.gov/ency/article/007681.htm. Accessed on 13 Feb 2023.
6. Seizures. Available at: https://kidshealth.org/en/parents/seizure.html. Accessed on 12 Jan 2023.
7. What to do if someone has a seizure (fit) [Internet]. Available at: https://www.nhs.uk/conditions/what-to-do-if-someone-has-a-seizure-fit/#:~:text=Support%20them%20gently%20and%20cushion,until%20they%20have%20fully%20recovered. Accessed on 13 Feb 2023.
8. General first aid for seizures [Internet]. Available at: https://www.epilepsy.com/recognition/seizure-first-aid. Accessed on Feb 13, 2023.

MAT-IN-2301336-V1.0-06/2023

sanofi Sanofi India Limited
Sanofi House CTS No. 117-B, L&T Business Park, Saki Vihar Road, Powai, Mumbai - 400072, India.



अपस्माराविषयी अनभिज्ञ असलेल्यांसाठी

sanofi

विषयी अनभिज्ञ असलेल्यांसाठी

# अपस्मार



## जागतिक स्तरावर दरवर्षी 5 दशलक्ष लोकांना अपस्माराचे निदान होते.[1]





## भारतात दरवर्षी दर 1,00,000 लोकांमधील सुमारे 60 लोकांना अपस्माराचे निदान होते

## तुमच्या कुटुंबातील एखाद्याला फेफरे किंवा फिट येत आहे हे तुम्ही कसे ओळखू शकता?

- फेफरे येते तेव्हा, तुम्हाला कदाचित असे दिसेल की त्या व्यक्तीने तिच्या कामाकडे लक्ष केंद्रित करणे थांबवले आहे आणि ती टक लावून पाहत आहे, तिचे डोळे वेगाने लुकलुकत आहेत किंवा ती गोंधळल्यासारखी दिसत आहे[3,4]
- ते अचानक पडू शकतात[3]
- त्यांचे हात किंवा पाय सतत थरथरत आहेत[3]
- त्यांचे शरीर ताठर झाले आहे[3]
- मूत्र किंवा शौच उत्सर्जनावरचे त्यांचे नियंत्रण ते गमावू शकतात[3]
- तुम्ही त्यांना विचारलेल्या कुठल्याही गोष्टीला कदाचित ते प्रतिसाद देणार नाहीत[3]
- त्यांच्या तोंडातून अति प्रमाणात लाळ बाहेर येऊ शकते[4]
- ते चघळण्यासारख्या हालचाली पुन्हा पुन्हा करू शकतात[4]
- ते त्यांचे डोके सतत हलवत राहू शकतात, त्यानंतर त्यांची शुद्ध हरपते किंवा भान राहत नाही[3]

- काहींना श्वासोच्छवासाचा त्रास सुद्धा होऊ शकतो, आणि त्यांचे ओठ निळसर पडू शकतात[3]
- याशिवाय, फेफरे येण्याच्या अगदी आधी, काहींना विचित्र संवेदना होऊ शकतात, जसे की मुंग्या येणे किंवा जी वस्तू नाही आहे तिचा वास येणे. त्यांना अस्वस्थ किंवा घाबरल्यासारखे सुद्धा वाटू शकते.[3,5]



**फेफऱ्याचा झटका आल्यानंतर, व्यक्तीला गोंधळल्यासारखे, थकल्यासारखे, झोप येत आहे असे, तहान लागली आहे असे वाटू शकते, किंवा डोकेदुखी होऊ शकते. ही अवस्था काही मिनिटे टिकू शकते.[3,4,6]**

## तुमच्या घरातील एखाद्याला प्रथमच फेफरे आल्याचे पाहून तुम्हाला चिंता वाटत असेल. मात्र, अशा वेळी, तुम्ही शांत राहून त्यांना मदत करण्यासाठी ही सोपी कामे करा:



ते जमिनीवर पडलेले असतील तर, त्यांच्या डोक्याखाली काहीतरी मऊ ठेवा[7]



ती व्यक्ती व्हीलचेअरवर बसली असेल तर, ब्रेक्स व सीटबेल्ट लावा आणि त्यांच्या डोक्याखाली उशी ठेवा. मात्र, त्यांना हलविण्याचा प्रयत्न करू नका.[7]



इजा टाळण्यासाठी जवळपासच्या वस्तू दूर हलवा[8]



गळ्याभोवती काही घट्ट कपडे असतील, जसे की कॉलर बटण किंवा टाय, तर ते काढून टाका. त्यामुळे रुग्णाला श्वास घ्यायला मदत होईल.[7]

त्यांना पूर्णपणे बरे वाटत नाही तोपर्यंत त्यांच्या तोंडात पाणी, अन्न किंवा औषधे यांसारखे काहीही टाकू नका. कारण अन्न, पाणी किंवा औषधे पुढे सरकण्याऐवजी त्यांच्या फुफ्फुसात जाऊ शकतात, ज्यामुळे त्यांना गुदमरल्यासारखे वाटू शकते.[7,8]



ते नीट श्वास घेत आहेत याची खात्री करा[8]